# स्टेज समोरून व स्टेजवरून...

– रवींद्र मांजरेकर

मी दहावीत होतो. ते साल १९९३. आम्ही सगळे मित्र-मैत्रिणी मिळून बेडेकर शाळेत पोहोचलो, ते 'वेध' परिषदेसाठी. शाळेच्या वेगवेगळ्या वर्ग खोल्यांमध्ये विविध विषयांतील तज्ज्ञांची सत्रे सुरू होती आणि तळमजल्यावर एक खुले सत्रही होते. ते माध्यमांशी निगडित होते. आम्ही सगळीकडे थोडा-थोडा वेळ थांबलो आणि मग त्या खुल्या सत्रात सहभागी झालो. सगळीकडून माहिती कानावर पडत होती. प्रश्न विचारले जात होते आणि उत्तरेही येत होती. खुल्या सत्राचे संचालन डॉ. आनंद नाडकर्णी करत होते आणि आम्हा सगळ्यांवर त्यांनी चांगलीच छाप पाडली होती. 'वेध' परिषद संपली असली तरी... असे आम्ही मनाशी पक्के केले होते.

पुढले वर्षेतर भन्नाटच निघाले. अकरावीत मो. ह. विद्यालयात ज्युनिअर कॉलेजला प्रवेश घेतला होता. त्या वर्षाची परिषद मो. ह. मध्येच होणार होती. 'वेध'च्या आयोजनात मदत करणाऱ्या आमच्या शाळेतील अविनाश बर्वेसरांनी एके दिवशी सकाळीच मला बोलावून घेतले आणि 'वेध' परिषदेच्या १९९४ च्या वर्षाचे पहिले तिकीट घेण्यास सांगितले. त्या वर्षी डॉ. नाडकर्णी यांनी उद्घाटनाचा वेगळाच बेत आखला होता. ***ज्याने पहिले तिकीट काढले, त्याला परिषदेचे उद्घाटन करण्याचा 'मान' मिळणार होता. तो अर्थातच मला मिळाला.*** उद्घाटन करायचे म्हणजे काय करायचे? मला समजावून सांगण्यात आले. एका मोठ्या फळ्यावर वेगवेगळ्या रंगांचे फुगे लावलेले होते आणि त्या खाली एकेक विषय लिहिला होता. मी छऱ्याच्या बंदुकीने त्यातील कोणताही एक फुगा फोडायचा की झाले उद्घाटन! एनसीसीच्या मित्रांनी माझा बंदूक चालवण्याचा सराव करून घेतला. माझ्याकडून नेम लागला नाही, तर कोणी बंदूक चालवायची हेही ठरले होते. प्रत्यक्षात, कर्म-धर्मसंयोगानेच, माझा नेम बरोबर लागला आणि उद्योग असे लिहिलेला फुगा फुटला. योगायोग म्हणजे त्या वर्षी ज्येष्ठ उद्योजक कॅमलिनचे सुभाष दांडेकर अध्यक्ष होते. तो नेम लागला खरा आणि त्या दिवसापासून 'वेध'शी माझे नाते जुळले. त्या दोन दिवसांत मी पूर्ण हवेत होतो. समारोपाच्या दिवशी डॉक्टरांना म्हणालो, 'वेध'साठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची माझी इच्छा आहे. डॉक्टर नेहमीप्रमाणे हसले. त्याच वर्षी, इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थतर्फे कॉलेजातील विद्यार्थ्यांसाठी 'आविष्कार' ही व्यक्तिमत्त्व स्पर्धा घेण्यात आली होती. मी त्यात भाग घेतला आणि आयपीएच परिवाराशी जोडला गेलो.



स्टेज समोरून

पुढल्या वर्षी मो. ह. विद्यालयाच्या पटांगणात परिषदेचे आयोजन करण्यात आले. आता पसारा वाढला होता. मोठे स्टेज, त्याच्या समोर आसनव्यवस्था, मंडप सगळेच, आधीच्या सगळ्या 'वेध'पेक्षा खूपच निराळे. त्या वर्षी माध्यमांच्या सत्रात आमिर खान येणार होता. त्यामुळे रविवारच्या सत्राला तर तुडुंब गर्दी. मी डॉक्टरांना संचालनाच्या कामात मदत करू लागलो होतो. उद्घाटनाचा कार्यक्रम झाला आणि त्यानंतरचे सत्र सुरू होण्यास विलंब होत होता. मी स्टेजवर होतो. कंट्रोल रूममधून निरोपाची वाटप पहात होतो. तो काही केल्या येत नव्हता. स्टेजसमोर

चुळबूळ वाढली होती. मी थोड्या धाडसानेच माईकचा ताबा घेतला आणि किरकोळ गप्पांनी सुरुवात केली. कोण येणार आहे, माहिती आहे का वगैरे, त्यात काही काळ गेला. मग सरळ कवितांची वही काढली आणि मंगेश पाडगावकरांची 'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं' ही कविता म्हणण्यास सुरू केली. सगळा गोंधळ थांबला आणि पुढील वक्ते येईपर्यंत बोलगाण्यांनी वेळ मारून नेली. त्या वर्षीचे 'वेध' पार पडले.

सगळी सत्रे संपली की, डॉक्टरांभोवती कोंडाळे करून आम्ही बसत असू, त्यात सुनंदा अमरापूरकर यांनी माझ्या पाठीवर शाबासकीची थाप मारली. छान बोललास! त्यांचे शब्द अजूनही मला स्पष्ट आठवतात. डॉक्टरांनी पुढे 'वेध'च्या संयोजनाच्या कामात सहभागी करून घेतले. सुरुवातीला स्टेजवर डॉक्टरांना मदत करत होतो. मग प्रश्न काढण्यातही सहभागी झालो. पुढे पत्रकारिता हा माझा पेशा झाला आणि महाराष्ट्र टाइम्समध्ये नोकरी करू लागलो. 'वेध'शी असलेले ऋणानुबंध कायमच राहिले ते अगदी आजतागायत. दरम्यानच्या काळात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. दीपिका दाबकेही आमच्या टीममध्ये आली. 'वेध'ची तयारी आता आम्ही यावर्षीचे 'वेध' संपले की, लगेच करू लागलो. ठिकाणे बदलली, स्टेजची रचना बदलली, मंडप जाऊन पुन्हा मोकळे आकाश झाले. आमची तीन जणांची टीम, अर्थातच सगळ्या पडद्यामागच्या स्वयंसेवकांच्या मदतीने, 'वेध'चे स्टेज अधिकाधिक प्रबोधनपर करण्यासाठी कार्यरत आहोत.




सनावळ्यांचे हिशेब मांडण्याचे खरे तर हे स्थान नाही; पण गेली २० वर्षे 'वेध' हा अविभाज्य भाग झाला आहे, हे आता सगळे लिहायला बसलो, तेव्हा लक्षात आले. 'वेध'मध्ये किती बदल झाले, तरी त्याचा गाभा बदलला नाही. अव्वाच्या सव्वा तिकीट नाही की फसव्या जाहिराती नाहीत. परिषदेकडून प्रबोधन संमेलनाकडे अशी ही वाटचाल झाली. अडीच हजार विद्यार्थी, एक हजार पालक, दोन दिवसांचा भरपूर विचार आणि अनुभवांचा ऐवज... हे विश्व उभे राहण्यासाठी दोन दशकांहून जास्त काळ गेला. अनेकांची मेहनत त्यात आहे. त्याच्याविषयी विस्ताराने या अंकात लिहिले गेले आहेच.

वेगवेगळ्या क्षेत्रातील एकापेक्षा एक व्यक्तिमत्त्वे भेटण्याचा वेध हा बेस कॅम्प झाला आहे. आजही 'वेध'ला मी विद्यार्थी म्हणूनच जातो. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रत्येक जण आपल्याला काही ना काही तरी देतच असतो. विचार देतो, शब्द देतो, आवाहन करतो... आपल्या म्हणून ज्या काही मर्यादा असतात, त्या ओलांडून जाण्याच्या किती शक्यता आहेत, हे येथे कळते. दरवर्षी या शक्यतांमध्ये भर पडते. सुरुवातीच्या काळात व्यवसाय मार्गदर्शन परिषद असेच 'वेध'चे स्वरूप होते. ते कालांतराने खूप बदलले आहे. 'व्यवसाय मार्गदर्शन परिषद ते प्रबोधन परिषद' असा व्यापक आवाका आता या आयोजनाला आला आहे. ही सगळी संकल्पना डॉ. आनंद नाडकर्णी यांचीच. अर्थात, त्यांनाही 'वेध' हे वीस वर्षांनंतर पूर्ण वेगळे स्वरूप होईल, याची कल्पना होती का, हा मला नेहमी पडणारा प्रश्न आहे.

दोन दशकांपूर्वी विद्यार्थी दशेत स्पर्धा होतीच; पण ती आता जशी अगदी जीवघेणी झाली आहे, तेवढी अक्राळविक्राळ नव्हती. ७५ टक्क्यांपर्यंत गुण मिळाले, म्हणजे तुम्ही विद्यार्थी म्हणून काठावर पास झालात, असे मानण्याइतके सगळे बिघडलेले नव्हते. त्यामुळे परिषदेला विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती. ती कालांतराने कमी होत गेली आणि पालकांची संख्या मात्र अतिशय वेगाने वाढत गेली. मुलाला तू क्लासला जा, मी परिषदेला जाऊन तुझ्यासाठी काय बरे वाईट ते लिहून आणतो, असे सांगणारेही अनेक जण दिसू लागले. हा गेल्या काही वर्षांतील मोठा बदल आहे. मला वाटते की, हा बदल

टिपूनच डॉ. नाडकर्णी यांनी परिषदेची सूत्रेही त्याच पद्धतीने आखण्यास सुरुवात केली. एकेका व्यक्तीची गाथा तर परिषदेत मांडली जातचे; पण समुदायाने एकत्र येऊन, अनेकांच्या प्रयत्नांतून साकार झालेल्या संघर्षगाथाही आता परिषदेच्या व्यासपीठावर येऊ लागल्या आहेत. परिषदेच्या सूत्राचे, त्या-त्या वेळच्या परिस्थितीचे सूतोवाच करणारी बीजभाषणे हा ठाण्याच्या 'वेध' परिषदेचा एक अविभाज्य भाग बनला आहे. आयोजनातील हा बदल डॉक्टरांनी जाणीवपूर्वक घडवून आणलाय, असे मला वाटते.

बेडेकर शाळेच्या वर्गखोल्यांमधून शिवसमर्थ विद्यातयाच्या पटांगणापर्यंत 'वेध'च्या बाह्य आयोजनातही आमूलाग्र बदल झाले. त्याचे स्वरूप वाढतेच राहिले आणि सहभागही वाढत गेला. छोटेखानी परिषदेचे संमेलन झाले ते त्या अर्थानेही! स्टेजसमोर असताना आयोजनातील हे बारकावे फारसे लक्षात आले नव्हते, तेवढी सजगही तेव्हा नव्हती. जसजसा आयोजनाचा एक भाग होत गेलो, तसे ते लक्षात आले. व्यवस्थापन, शिस्त, संयोजन, सहकार्य असे अनेक धडे या काळात शिकण्यास मिळाले. 'वेध'मुळे मला या गोष्टींचा अनुभव मिळालाच. शिवाय, सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आत्मविश्वास मिळाला. जो नंतरच्या काळात पत्रकारितेच्या दृष्टीनेही मला खूपच महत्त्वाचा ठरला. स्टेजवर अनेक नजरा खिळलेल्या असताना कोणत्याही प्रकारचा गोंधळ होऊ न देता एखादी गोष्ट सावरून घेणे हे कसब खूप मोठे आहे, ते मी डॉक्टरांकडून शिकण्याचा प्रयत्न करतो आहे. माणसांना बोलते करणे हा तर खूपच मोठा अनुभव. तो जेवढा मिळेल, तेवढा कमीच! सूत्रसंचालक म्हणून मला एक आणखी अनुभव मिळाला, तोही खूप महत्त्वाचा. विशिष्ट प्रकारच्या कार्यक्रमांना त्या-त्या प्रकारचा प्रेक्षक, श्रोता असतो. त्यांच्याशी जुळवून घेता येते. 'वेध'चे तसे नसते. 'वेध'मध्ये नववीतील विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सगळ्यांचा समावेश असतो. त्या सगळ्यांना जोडून घेण्यासाठी डॉक्टर जसा एखाद्या सत्राचा सारांश सांगतात, तसा तो सांगण्याचा तोकडा का होईना; पण तसा प्रयत्न आता मी आणि दीपिकाने सुरू केला आहे. सोपे बोलणे किती अवघड असते, ते अशावेळी कळते.

'वेध'च्या तयारीच्या निमित्ताने डॉक्टरांशी चर्चा करण्याची संधी मिळते. प्रश्न काढण्यासाठी त्या-त्या व्यक्तिमत्त्वाविषयी अधिक जाणून घेता येते. त्यामुळे अनेक कंगोरे लक्षात येतात. किती तरी प्रकारच्या शैली, सादरीकरणे, विचारांच्या दिशा यांनी 'वेध'ची दरवर्षीची अनुभवाची शिदोरी समृद्ध होतेच आहे. डीव्हीडींच्या निमित्ताने तो साठा कायम सोबत ठेवणेही सोयीचे झाले आहे. बीजभाषणाच्या पहिल्या मिनिटापासून ते रविवारच्या शेवटच्या सत्रापर्यंत सगळे कागदावर स्पष्ट उतरलेले असते. प्रत्येकाचे काम त्याला वाटून दिलेले असते. त्यावर हूकूम सगळे आपापली कामे करतात आणि त्यातूनच परिपूर्ण असे 'वेध' संमेलन आकाराला येते.

कॉलेजाचा विद्यार्थी म्हणून मी प्रथम 'वेध' परिषदेला आलो, तेव्हा माणसे जाणून घेण्याचे कुतूहल होते, आवडही होती. 'वेध'च्या आजवरच्या प्रवासात हे कुतूहल आणि आवड कायम राहिली. नव्हे तो छंदच जडला.

समुद्राच्या काठावर अंड्यातून बाहेर येणारे बोटभर लांबीचे कासवाचे पिलू... मोठ्या दिमाखात भल्या मोठ्या समुद्रात शिरण्याचा प्रयत्न करते आणि पहिल्या, दुसऱ्या.... दहाव्या प्रयत्नात ते तसे करण्यात यशस्वी होते. त्या इवल्याशा कासवाच्या ठायी जो आत्मविश्वास निसर्गत:च निर्माण होतो. तसाच जबरदस्त अनुभवसंपन्न आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम 'वेध'ने माझ्यासह अनेकांच्या आयुष्यात केले आहे. तो आत्मविश्वास प्रबळ व्हावा, डगमगू नये म्हणून दरवर्षी विद्यार्थी म्हणून 'वेध' संमेलनास मी येतो. माझ्यासारखे अनेकजण येतात. हे 'वेध'चे मोठे यश आहे, असे मला वाटते.

**– रवींद्र मांजरेकर**

**ठाणे**

ravindra.manjarekar@gmail.com

(लेखक 'वेध' ठाणे येथे सहसूत्रसंचालक आहेत. ते सध्या महाराष्ट्र टाइम्सच्या मुंबई आवृत्तीत 'मुख्य वार्ताहर' या पदावर कार्यरत आहेत.)